सोलापूर
तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २२ एप्रिल २०२६

आतील पानावर

पान २– धनुषचा 'कारा' येतोय भेटीला
पान ३– मधुबालाच्या बायोपिकसाठी शर्वरी आघाडीवर?
पान ४– धनुषच्या चित्रपटात सारा अर्जुनची एन्ट्री
पान ५– भूषण प्रधानची 'स्वप्नसुंदरी' लवकरच पडद्यावर!
पान ७– अभिषेकचे मराठी चित्रपटात पदार्पण

# तापसीचे 'गांधारी'मधून दमदार कमबॅक



बॉलीवूड अभिनेत्री तापसी पन्नू पुन्हा एकदा प्रेक्षकांना ॲक्शनचा जबरदस्त अनुभव देण्यासाठी सज्ज झाली आहे. तिचा बहुप्रतीक्षित चित्रपट 'गांधारी' सध्या चर्चेत असून, या चित्रपटातून ती पुन्हा एकदा हाय-ऑक्टेन ॲक्शन अवतारात दिसणार आहे. 'बेबी' आणि नाम शबानामधील तिच्या दमदार परफॉर्मन्सनंतर चाहत्यांना तिच्या ॲक्शन अवताराची प्रतीक्षा होती, जी आता 'गांधारी'मुळे पूर्ण होणार आहे. या चित्रपटाबद्दल बोलताना तापसी पन्नू यांनी स्पष्ट केलं की, हा प्रोजेक्ट तिच्या करिअरसाठी खूप खास आहे. मी 'नाम शबाना'नंतर पुन्हा एकदा गंभीर ॲक्शन करत आहे. बराच काळ झाला आहे. लोक मला नेहमी विचारतात की, तू पुन्हा ॲक्शन कधी करणार? त्यांना माझं आधीचं काम आठवतं, असे अभिनेत्रीने म्हटले आहे. विशेष म्हणजे, 'गांधारी'मधील ॲक्शन सीक्वेन्सेसमध्ये कोणत्याही प्रकारच्या VFX, ब्लू स्क्रीन किंवा फेस रिप्लेसमेंटचा वापर करण्यात आलेला नाही. आजच्या काळात जेथे अनेक चित्रपटांमध्ये तांत्रिक साधनांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहिलं जातं, तिथे तापसीने स्वतः ॲक्शन सीन साकारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या चित्रपटातील प्रत्येक सीन अधिक वास्तववादी आणि प्रभावी वाटणार आहे. अभिनेत्रीने पुढे सांगितले, फेस रिप्लेसमेंटसारखी तंत्रज्ञानं मोठ्या बजेटच्या चित्रपटांमध्ये सहज वापरता येतात. पण माझ्या चित्रपटांमध्ये तसं नसतं, त्यामुळे मला सगळं स्वतः करावं लागतं. हे हवेत उडणाऱ्या फॅन्सी ॲक्शनसारखं नाही, तर वास्तववादी आहे. त्यामुळे ते खूपच कठीण आणि थकवणारं असतं. असे अभिनेत्रीने म्हटले आहे. 'नाम शबाना'नंतर काही काळ तापसीने जाणीवपूर्वक ॲक्शनपासून अंतर ठेवले होते. कारण अशा प्रकारच्या भूमिकांसाठी केवळ मानसिकच नाही, तर शारीरिक तयारीही तितकीच महत्त्वाची असते. मी स्वभावतः आक्रमक व्यक्ती नाही, त्यामुळे अशा भूमिका साकारताना स्वतःला पूर्णपणे बदलावं लागतं. 'गांधारी'मध्ये तुम्ही मला भरपूर ॲक्शन करताना पाहाल, आणि हे सगळं मी स्वतः केलं आहे, असं अभिनेत्रीचे म्हणणे आहे. अलीकडेच 'अस्सी'मधील भावनिक भूमिकेमुळे प्रेक्षकांची मनं जिंकणारी तापसी पन्नू आता 'गांधारी'च्या माध्यमातून ॲक्शनची झलक दाखवण्यासाठी सज्ज झाली आहे. तिच्या या नव्या अवतारामुळे प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. एकंदरीत, 'गांधारी' हा केवळ ॲक्शन चित्रपट नसून, एका अभिनेत्रीच्या मेहनतीचा, जिद्दीचा आणि स्वतःला सतत नव्याने सिद्ध करण्याच्या प्रवासाचा पुरावा आहे. येत्या काही महिन्यांत प्रदर्शित होणारा हा चित्रपट नक्कीच बॉक्स ऑफिसवर मोठा ठसा उमटवेल, अशी अपेक्षा आहे.



# कपूर घराण्यातील 'ही' सुंदरी करतेय ग्रँड बॉलिवूड डेब्यू

बॉलिवूडमध्ये कपूर कुटुंबाचा चांगलाच दबदबा आहे. गेल्या अनेक वर्षांपासून हे घराणं इंडस्ट्रीवर एक प्रकारे राज्य करत आहे. कपूर कुटुंबातील जवळपास ४ पिढ्या बॉलिवूडमध्ये सक्रीय आहेत. त्यामुळे या कुटुंबाविषयी अनेक गोष्टी चाहत्यांना ठावूक आहे. पृथ्वीराज कपूरपासून ते रणबीर कपूरपर्यंत अनेक सुपरस्टार या घराने इंडस्ट्रीला दिले आहेत. इतकंच नाही तर प्रत्येकजण यशस्वी झाला असून त्यांनी आपलं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. याच कुटुंबातील एक सदस्य मात्र वयाच्या ४५ व्या वर्षी बॉलिवूडमध्ये पदार्पण करत आहे. सुपरस्टार रणबीर कपूरची मोठी बहीण रिद्धिमा कपूर साहनी वयाच्या ४५ व्या वर्षी अभिनेत्री म्हणून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. विशेष म्हणजे, तिच्या पहिल्याच चित्रपटात ती 'कॉमेडी किंग' कपिल शर्मा आणि स्वतःची आई नीतू कपूर यांच्यासोबत स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे. रिद्धिमा कपूर ज्या चित्रपटातून पदार्पण करत आहे, त्याचं नाव आहे 'दादी की शादी'. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला असून, यात कौटुंबिक ड्रामा, विनोद आणि इमोशन्सची जबरदस्त मेजवानी पाहायला मिळत आहे. आतापर्यंत फॅशन आणि ज्वेलरी डिझायनिंग क्षेत्रात नाव कमावलेली रिद्धिमा अभिनयात काय कमाल करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. चित्रपटाच्या पोस्टरमध्ये कपिल शर्मा, नीतू कपूर, रिद्धिमा कपूर साहनी आणि सादिया खतीब यांच्यासह अनेक कलाकार दिसत आहेत. चित्रपटाचे शीर्षकच अत्यंत रंजक असल्याने, हा चित्रपट एका आजीच्या लग्नाभोवती फिरणाऱ्या गमतीजमतींवर आधारित असल्याचे स्पष्ट होत आहे. रिद्धिमाच्या या बहुप्रतिक्षित चित्रपटाच्या प्रदर्शनाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. 'दादी की शादी' हा चित्रपट ८ मे २०२६ रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे. रिद्धिमा कपूरने २००६ साली बिझनेसमन भरत साहनीसोबत लग्नगाठ बांधली होती. तिला समायरा ही वर्षांची मुलगी आहे. रिद्धिमा दिसायला खूप सुंदर असून अनेकदा तिला तू अभिनेत्री का झाली नाही असा प्रश्न विचारण्यात आला होता. आता अखेर ती वयाच्या ४५ व्या वर्षी पदार्पण करत आहे.



# गायक अरिजीत सिंह आता दिग्दर्शक बनणार?

बॉलिवूडचा लोकप्रिय गायक अरिजीत सिंहने २७ जानेवारी रोजी एक सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आणि या पोस्टमुळे त्याच्या चाहत्यांसह रसिक श्रोत्यांना धक्का बसला. कारण या पोस्टमधून अरिजीतने पार्श्वगायनातून निवृत्ती घेत असल्याची घोषणा केली होती. त्याच्या हा निर्णय काही चाहत्यांना आवडला नाही. पण काहींनी त्याच्या या निर्णयाचे कौतुक केले. अरिजीत आता चित्रपटांसाठी गाणी गाणार नसला, तरी तो त्याची स्वतंत्र गाणी घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. दरम्यान, अरिजीतबाबत आता एक नवीन बातमी समोर आली आहे. ती म्हणजे पार्श्वगायन सोडल्यानंतर अरिजीत एका नव्या क्षेत्रात पाऊल ठेवत आहे. वृत्तानुसार, अरिजीत सिंह आता दिग्दर्शक बनणार आहे. त्याने आपल्या पहिल्या चित्रपटाची संपूर्ण तयारी केली आहे. विशेष म्हणजे, अरिजीतने त्याच्या पहिल्या चित्रपटात प्रसिद्ध अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकीची मुलगी शोरा सिद्दीकीला संधी दिली आहे. पार्श्वगायनानंतर अरिजीत आता चित्रपट दिग्दर्शन आणि निर्मितीच्या क्षेत्रात नशीब आजमावणार आहे. अरिजीत ज्या चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन करत आहे, त्याचे शूटिंग लंडनमध्ये सुरू झाले आहे. एकाच शहरात राहूनही तीन वेगवेगळ्या व्यक्तींचे आयुष्य कसे असते, हे या चित्रपटातून पहायला मिळेल. सामाजिक विषमता आणि संघर्षावर आधारित या चित्रपटाची कथा असल्याचे म्हटले जात आहे. दरम्यान, चित्रपटाच्या प्रदर्शनाबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. शोरा सिद्दीकी व्यतिरिक्त या चित्रपटात इतर कोणते कलाकार असणार, याबाबतही गुप्तता आहे. अरिजीतचे हे चित्रपट दिग्दर्शनातील पाऊल त्याच्या करिअरसाठी नवीन वळण ठरणार आहे. आता हा चित्रपट स्वतःच्या बॅनरखाली प्रदर्शित करणार की एखाद्या मोठ्या प्रोडक्शन हाऊसची मदत घेणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. अरिजीतच्या या नव्या प्रयत्नासाठी त्याचे चाहतेही खूप उत्सुक आहेत. सुमधुर गायनासाठी ओळखला जाणारा अरिजीत हा सर्वात लोकप्रिय गायक आहे. रिॲलिटी शोमधून आपला सांगीतिक प्रवास सुरू करत तो आज बॉलीवूडच्या सध्याच्या टॉप गायकांपैकी एक गायक बनला. पण त्याने अचानक निवृत्तीची घोषणा केली, ज्यामुळे त्याचे असंख्य चाहते नाराज झाले आहेत. सिनेमात परेश रावल, राजपाल यादव, गोवर्धन असरानी आणि वामिका गब्बी यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. हा सिनेमा १७ एप्रिल रोजी सिनेमागृहांत प्रदर्शित झाला आहे.



# धनुषचा 'कारा' येतोय भेटीला

बॉलिवूड चित्रपट 'तेरे इश्क में'द्वारे प्रशंसा मिळविणारा धनुष आता नव्या चित्रपटावरून चर्चेत आहे. निर्मात्यांनी धनुषचा आगामी चित्रपट 'काराच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केली आहे.दिग्दर्शन विग्नेश राजा यांनी केले आहे. ॲक्शन एंटरटेनर चित्रपट ३० एप्रिल रोजी प्रदर्शित होणार असल्याची माहिती इशारी के. गणेश यांनी जाहीर केली आहे. त्यांचे प्रॉडक्शन हाउस वेल्स फिल्म इंटरनॅशनलच्या बॅनर अंतर्गत 'कारा या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. कुठल्याही गोष्टीला जर स्वतःचा ड्रीम प्रोजेक्ट म्हणायचे असल्यास मी निश्चितपणे अभिनेता धनुषसोबतचा 'वदा चेन्नई २ सांगेन. तसेच धनुषचा चित्रपट 'कारा ३० एप्रिल रोजी प्रदर्शित होणार असल्याचे इशारी के. गणेश यांनी सांगितले आहे. गणेश हे वेल्स युनिव्हर्सिटीचे संस्थापक अन् कुलगुरु आहेत. निर्मात्यांनी पोंगल वेळी या चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित केला होता, यात धनुष हा इंटेंस लुकमध्ये दिसून आला. 'कधीकधी धोकादायक म्हणून गहणेच जिवंत राहण्याचा मार्ग असतो असे या पोस्टरमध्ये लिहिले गेले होते. कारा चित्रपटात ममिता बैजू नायिका आहे. याचबरोबर एस. रविकुमार, जयराम सूरज वेंजारामूडु, करुणास आणि पृथ्वी पंडिराज हे महत्त्वाच्या भूमिकेत आहेत.



# मधुबालाच्या बायोपिकसाठी शर्वरी आघाडीवर?

दिग्दर्शक बॉलीवूडमधील दिग्गज अभिनेत्री मधुबाला यांच्या आयुष्यावर आधारित बायोपिक सध्या खूप चर्चेत आहे. या चित्रपटात मधुबालांची भूमिका कोण साकारणार, याबाबत अनेक अभिनेत्रींची नावे समोर येत आहेत. आता या यादीत अभिनेत्री शर्वरी वाघ हिचे नाव आघाडीवर असल्याचे समोर येत आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, शर्वरीला या महत्त्वाच्या भूमिकेसाठी विचारले जात आहे. काही अहवालांमध्ये असेही म्हटले जात आहे की, ती या रोलसाठी टॉप चॉइसपैकी एक आहे. मात्र, अद्याप याबाबत अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे शर्वरीची निवड निश्चित झाली आहे का, याबाबत अजून स्पष्टता नाही. मधुबालाच्या बायोपिकसाठी अनेक तरुण अभिनेत्रींची नावे चर्चेत होती. यात सारा अर्जुन, कल्याणी प्रियदर्शन, साई पल्लवी आणि अनीत पड्डा यांचा समावेश होता. या सर्व अभिनेत्रींपैकी अनीत पड्डा हिला सुरुवातीला मजबूत दावेदार मानले जात होते. पण आता शर्वरीचे नाव पुढे येत असल्यामुळे स्पर्धा अधिक रंगतदार झाली आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन जसमीत के. रीन करणार आहेत. त्यांनी यापूर्वी डार्लिंग्स या चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते, ज्याला चांगला प्रतिसाद मिळाला. त्यामुळे या बायोपिककडूनही अपेक्षा आहेत. शर्वरीच्या कामाबद्दल बोलायचे झाले, तर ती सध्या अनेक मोठ्या प्रोजेक्ट्समध्ये व्यस्त आहे. ती लवकरच इम्तियाज अली यांच्या 'मैं वापस आऊंगा' या चित्रपटात दिसणार आहे. हा चित्रपट १२ जून २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. तसेच ती आलिया भट्ट सोबत 'अल्फा' या महिला जासूसी चित्रपटातही झळकणार आहे. याशिवाय 'मुंज्या २' हाही चित्रपट तिच्याकडे आहे. मधुबालाच्या आयुष्यावर आधारित हा चित्रपट बॉलीवूडमधील सर्वात चर्चित प्रोजेक्ट्सपैकी एक मानला जात आहे. त्यांच्या सौंदर्य, अभिनय आणि वैयक्तिक आयुष्याबद्दल आजही प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. त्यामुळे त्यांच्या भूमिकेसाठी योग्य अभिनेत्रीची निवड करणे हे निर्मात्यांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. आता सर्वांचे लक्ष अधिकृत घोषणेकडे लागले आहे. शर्वरीच या बायोपिकमध्ये मधुबालांची भूमिका साकारणार का, की आणखी एखाद्या अभिनेत्रीच्या नावावर शिक्कामोर्तब होणार, हे लवकरच स्पष्ट होईल.



# 'कृष्णावतारम'चा ट्रेलर रिलीज




मथुरेच्या पावन भूमीवर चित्रपट आणि अध्यात्म यांच्यातील एक अभूतपूर्व सोहळा पाहायला मिळाला. बहुप्रतिक्षित 'कृष्णावतारम' चित्रपटाचा ट्रेलर पवित्र कृष्ण जन्मभूमीवर प्रदर्शित करण्यात आला, ज्यामुळे हजारो भक्तांना श्रद्धेच्या एका शक्तिशाली सामूहिक अनुभवात स्वत:ला जोडता आले. ट्रेलर लाँच म्हणून सुरू झालेल्या या कार्यक्रमाचे स्वरूप इतके वेगळे झाले की सगळीकडे अध्यात्माचे वातावरण निर्माण झाले. प्रभू श्रीकृष्णाच्या जन्मस्थानी भक्तांनी मोठी गर्दी केली होती आणि संपूर्ण वातावरण जयघोषाने दुमदुमून गेले होते. या ट्रेलर लाँचचा विस्तार केवळ एका ठिकाणापुरता मर्यादित नव्हता. तर तो रमण रेती मंदिर, राधा राणी मंदिर, प्रेम मंदिर आणि इस्कॉन वृंदावन यांसारख्या अनेक प्रमुख पवित्र स्थळांतील लोकांपर्यंत पोहोचला. यामुळे या कार्यक्रमाला एक वेगळेच स्वरूप प्राप्त झाले. निर्मात्यांनी या चित्रपटाला एक 'भावपूर्ण सादरीकरण' असे संबोधले आहे. हा चित्रपट केवळ भव्यता दाखवण्यासाठी नाही, तर जगभरातील भक्तांना एक खोल भावनिक आणि आध्यात्मिक सिनेमॅटिक अनुभव देण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आला आहे. प्रकाश कापडिया आणि राम मोरी यांनी लिहिलेल्या या चित्रपटाचे छायांकन अयानंका बोस यांनी केले आहे. चित्रपटाला प्रसाद एस. यांचे संगीत लाभले असून प्रसिद्ध गीतकार इरशाद कामिल यांनी गाणी लिहिली आहेत. याशिवाय प्रोडक्शन डिझाईन चोक्स भारद्वाज यांचे असून वेशभूषा निधी यशा यांनी डिझाइन केली आहे. 'कृष्णावतारम'चे जागतिक स्तरावर वितरण एए फिल्म्सद्वारे केले जाणार असून याचे संगीत सारेगामा द्वारे रिलीज केले जाईल. केवळ एका चित्रपटापेक्षाही पुढे जाऊन 'कृष्णावतारम' हे भक्तीचे दिव्य रूप म्हणून समोर येत आहे. दैवी प्रेमाची कथा एका अभूतपूर्व स्तरावर मोठ्या पडद्यावर सादर होणार आहे. हार्दिक गज्जर यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटाची निर्मिती क्रिएटिवलँड स्टुडिओज एंटरटेनमेंटचे साजन राज कुरुप आणि शोभा संत, तसेच अथाश्रीकथा मोशन पिक्चर्सचे पूनम श्रॉफ आणि पार्थ गज्जर यांनी केली आहे. तीन भागांच्या मालिकेतील पहिला अध्याय ७ मे २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होण्यासाठी सज्ज आहे.

# 'महावतार'मध्ये दीपिकाच्या जागी मराठमोळी अभिनेत्री?

बॉलिवूड अभिनेता विकी कौशल सध्या त्याच्या आगामी पौराणिक चित्रपट 'महावतार' मुळे चर्चेत आहे. भगवान परशुरामांच्या आयुष्यावर आधारित असलेल्या या चित्रपटात विकीसोबत कोणती अभिनेत्री झळकणार, याबाबत गेले अनेक दिवस चर्चा होती. यात दीपिका पादुकोण मुख्य भूमिकेत दिसले, असं बोललं जात होतं. मात्र, आता वृत्तानुसार, दीपिकाला वगळून एका दुसऱ्याच ब्लॉकबस्टर अभिनेत्रीची एन्ट्री झाली आहे. ती अभिनेत्री म्हणजे खुद्द 'मॅडॉक फिल्म्स'ची लाडकी स्त्री श्रद्धा कपूर आहे. वृत्तानुसार, दिग्दर्शक अमर कौशिक आणि निर्माते दिनेश विजन यांनी 'महावतार'मधील महत्त्वाच्या भूमिकेसाठी श्रद्धा कपूरशी बोलणी सुरू केली आहे. ८०० कोटींहून अधिक कमाई करणार्‍या 'स्त्री २' नंतर श्रद्धा कपूरची लोकप्रियता गगनाला भिडली आहे. 'महावतार' चित्रपटाच्या टीमला अशा एका अभिनेत्रीची गरज होती, जिची 'स्टार पॉवर' जबरदस्त आहे आणि जी पौराणिक भूमिकेला न्याय देऊ शकेल. या निकषांत श्रद्धा अगदी चपखल बसत असल्याचे निर्मात्यांचे मत आहे. 'महावतार'च्या निमित्ताने प्रेक्षकांना एक नवी कोरी जोडी पाहायला मिळणार आहे. विकी कौशल आणि श्रद्धा कपूर यांनी यापूर्वी कधीही एकत्र काम केलेले नाही. या नव्या केमिस्ट्रीमुळे प्रेक्षकांमध्ये चित्रपटाबद्दलची उत्सुकता अधिकच वाढली आहे. हा चित्रपट भगवान परशुरामांच्या आख्यायिकेवर आधारित आहे. 'मॅडॉक फिल्म्स' हा चित्रपट अत्यंत भव्य प्रमाणावर तयार करत आहे. चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख अद्याप गुलदस्त्यात असली, तरी तो २०२७ पर्यंत प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. या वर्षाच्या जून महिन्यानंतर चित्रपटाच्या शुटिंगला सुरुवात होऊ शकते. अभिषेक याबद्दल म्हणाला, एकदा असंच रेड कार्पेट टवर मी खूप गंभीर हावभावात त्यांना दिसलो आणि ते मला येऊन विचारायला लागले की सर आमच्याकडून काही चुकलं आहे का? तेव्हा मला खरंच हसू आलेलं.





# प्रेमात उद्ध्वस्त झालं राम्याचं करिअर

साऊथसह बॉलिवूडमध्येही आपल्या अभिनयाची छाप पाडणारी अभिनेत्री म्हणजे राम्या कृष्णन. अभिनयामुळे चर्चेत येणारी बाहुबलीची ही शिवगामी खऱ्या आयुष्यातही तितकीच चर्चेत आली. यशाच्या शिखरावर असतानाच तिच्या आयुष्यात अशा काही घटना घडल्या ज्यामुळे तिच्या करिअरची वाट चुकली. राम्या त्याकाळी साऊथ इंडस्ट्रीमधील लोकप्रिय, यशस्वी आणि सर्वाधिक मानधन घेणारी अभिनेत्री म्हणून ओळखली जायची. याच काळात तिचं नाव दिग्दर्शक के.एस. रविकुमार यांच्यासोबत जोडलं गेलं. या जोडीने अनेक सिनेमांसाठी एकत्र काम केलं होतं. विशेष म्हणजे याच काळात त्यांचं एकमेकांवर प्रेम जडलं. मात्र, त्यावेळी रविकुमार हे विवाहित होते. त्यामुळे राम्या आणि त्यांच्या नात्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ लागले. विशेष म्हणजे रविकुमार यांच्या प्रेमात असलेली राम्या लग्नापूर्वीच प्रेग्नंट झाली. त्याकाळी लग्नापूर्वी एखादी अभिनेत्री आई होणार ही गोष्ट फार मोठी समजली जात होती. या सगळ्याचा परिणाम तिच्या करिअरवर झाला. सूत्रांच्या माहितीनुसार, रविकुमार यांनी राम्याला गर्भपात करण्याचा सल्ला दिला होता. सोबतचच कुटुंबीय आणि समाजाकडून होणाऱ्या दबावामुळे राम्याने गर्भपात करायचा निर्णय घेतला. या घटनेनंतर राम्या आणि रविकुमार यांच्या नात्यात वितुष्ट आलं. त्यानंतर राम्या पुन्हा एकदा दिग्दर्शक कृष्णा वामसी यांच्या प्रेमात पडली. या जोडीने २००५ मध्ये लग्नगाठ बांधली. आज या जोडीला एक मुलगादेखील आहे. राम्याने तिच्या करिअरमध्ये अनेक सुपरहिट सिनेमा दिले आहेत.

# थलपतीच्या ‘जन नायगन’च्या अडचणी काही संपेनात!



शाहिद कपूर, दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील सुपरस्टार थलपती विजय हा त्याच्या अभिनयासह चित्रपटांसाठी देखील ओळखला जातो. गेल्या ३० वर्षांहून अधिक काळ त्याने प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. राजकारणी थलपती विजय हा मागील काही दिवसांपासून त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे प्रचंड चर्चेत आहे. तसेच अभिनेता त्याचा शेवटचा सिनेमा म्हणून घोषित केलेल्या 'जन नायगन' या चित्रपटामुळे चर्चेच्या केंद्रस्थानी आहे.थलपती विजयची शेवटचा सिनेमा 'जन नायगन' रिलीज होण्याच्या वाटेवर आहे. पण आता या चित्रपटाशी संबंधित एक मोठी बातमी समोर येत आहे. ही बातमी निर्मात्यांना काळजीत टाकणारी आहे. प्रदर्शनापूर्वीच थलपती विजयचा 'जन नायगन' चित्रपटाच्या अडचणीत वाढ झाल्याचं पाहायला मिळतंय. कारण, हा चित्रपट ऑनलाइन लीक झाल्याची माहिती मिळते आहे. थलपती विजयने यावर प्रतिक्रिया देखील दिली आहे. दरम्यान, याबाबत विजयने त्याच्या अधिकृत इंस्टाग्राम अकाउंटवर पोस्ट शेअर करत म्हटलंय, जन नायगनची लीक झालेली क्लिप शेअर करणार्या सर्व अकाउंट्सविरुद्ध सायबर गुन्ह्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. अधिकारी यात सामील असलेल्या प्रत्येक आयडीचा शोध घेत असून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. याआधी देखील अनेक सिनेमे ऑनलाईल लीक झाल्यामुळे निर्मात्यांना मोठं नुकसान झालं. सिनेमा ऑनलाईन लीक झाल्यानंतर प्रेक्षक थिएटरमध्ये जाण्याची तसदी घेत नाहीत. त्यामुळे कुठेतरी याचा आर्थिक फटका हा निर्मात्यांना बसू शकतो. 'जन नायगन' ला अजून CBFC कडून प्रमाणपत्र मिळालेले नाही, परंतु चित्रपटातील पाच मिनिटांपेक्षा जास्त फुटेज ऑनलाइन लीक झाले असून ते अनेक अकाउंट्सद्वारे प्रसारित केले जात आहे. अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे. या क्लिपमध्ये विजयचे काही ॲक्शन सीन्स आणि अन्य काही सीक्वेंस देखील पाहायला मिळतायत.काहींनी तर असा दावा केला आहे की, त्यांना केवळ पाच मिनिटांची क्लिपच नव्हे, तर सिनेमातील सर्वच दृश्यं ऑनलाइन व्हायरल झाल्याची दिसत आहेत. 'जन नायगन'च्या बऱ्याच क्लिप्स प्रसार माध्यमाध्यमांवर लीक झाल्या होत्या, मात्र त्यापैकी काही नंतर काढून टाकण्यात आल्या.

# धनुषच्या चित्रपटात सारा अर्जुनची एन्ट्री



धुरंधर'नंतर सारा अर्जुनला एक मोठा साऊथ चित्रपट मिळाल्याची चर्चा आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ती आता साऊथ स्टार धनुषसोबत मुख्य अभिनेत्री म्हणून दिसू शकते. हा तिच्यासाठी खूप मोठा प्रोजेक्ट मानला जात आहे. त्यामुळे तिच्या चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंहच्या 'धुरंधर' फ्रँचायझीने बॉक्स ऑफिसवर मोठा धमाका केला आहे. या चित्रपटातील प्रत्येक कलाकाराला प्रेक्षकांनी भरभरून प्रेम दिलं.

विशेषतः सारा अर्जुन हिने साकारलेलं 'यालिना' हे पात्र प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलं. तिच्या अभिनयामुळे ती चांगलीच चर्चेत आली असून आता तिच्या करिअरला मोठं वळण मिळताना दिसत आहे. 'धुरंधर'नंतर सारा अर्जुनला एक मोठा साऊथ चित्रपट मिळाल्याची चर्चा आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ती आता साऊथ स्टार धनुषसोबत मुख्य अभिनेत्री म्हणून दिसू शकते. हा तिच्यासाठी खूप मोठा प्रोजेक्ट मानला जात आहे. त्यामुळे तिच्या चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. धनुष सध्या आपल्या 'कारा' या आगामी चित्रपटाच्या तयारीत व्यस्त आहे. हा चित्रपट ३० एप्रिलला प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन विग्नेश राजा यांनी केलं आहे. याशिवाय धनुषने आणखी एका नव्या प्रोजेक्टवर स्वाक्षरी केली आहे. हा चित्रपट 'लुबर पंधू'चे दिग्दर्शक तमिळरासन पचामुथू यांच्या दिग्दर्शनाखाली तयार होणार आहे. याच चित्रपटात सारा अर्जुनला मुख्य अभिनेत्री म्हणून घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. महत्त्वाचं म्हणजे, या भूमिकेसाठी आधी 'कांतारा: चॅप्टर १' मधील अभिनेत्री रुक्मिणी वसंत हिचं नाव चर्चेत होतं. पण तिच्या व्यस्त वेळापत्रकामुळे ती या प्रोजेक्टमधून बाहेर पडली असल्याचं सांगितलं जात आहे. रुक्मिणी वसंत सध्या अनेक मोठ्या चित्रपटांमध्ये काम करत आहे. विशेष म्हणजे ती लवकरच ज्युनियर एनटीआरसोबत 'ड्रॅगन' या मोठ्या चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटासाठी तिने आधीच बऱ्याच तारखा दिल्या असल्यामुळे इतर चित्रपटांसाठी वेळ देणं तिला शक्य झालं नाही. यामुळेच निर्मात्यांनी सारा अर्जुनला या भूमिकेसाठी निवडल्याची चर्चा सुरू आहे. मात्र, या बाबत अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. पण 'धुरंधर'नंतर सारा अर्जुनच्या लोकप्रियतेत झालेली वाढ पाहता, तिला हा मोठा ब्रेक मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. एकंदरीत, 'धुरंधर'मुळे सारा अर्जुनला नवं व्यासपीठ मिळालं आहे आणि आता ती साऊथ इंडस्ट्रीत मोठी झेप घेण्याच्या तयारीत आहे. येत्या काळात तिची ही नवी जोडी प्रेक्षकांना किती आवडते, हे पाहणं उत्सुकतेचं ठरणार आहे.



# नामदेव ढसाळांच्या बायोपिकमध्ये झळकणार ललित प्रभाकर

अलीकडच्य ललित प्रभाकरने आतापर्यंत विविध विषयांवर आधारित चित्रपटांत काम केलं आहे. तो कायम चित्रपटांमार्फत काहीतरी नवीन विषय घेऊन प्रेक्षकांसमोर येण्याचा प्रयत्न करत असतो. अशातच आता ललित पुन्हा एकदा एका महत्त्वपूर्ण भूमिकेतून प्रेक्षकांसमोर येणार आहे. ललित प्रभाकर दलित पँथर आणि विद्रोही कवी नामदेव ढसाळ यांच्या जीवनावर आधारित 'ढसाळ' या चरित्रपटातून झळकणार आहे. 'डॉ. आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती' निमित्ताने या चित्रपटाचे भव्य पोस्टर प्रदर्शित झाले. नामदेव ढसाळ यांच्या जीवनावर आधारित 'ढसाळ' या चरित्रपटाची तारीखसुद्धा जाहीर झाली आहे. येत्या १ ऑक्टोबर २०२६ रोजी हा चरित्रपट सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे. मराठी आणि हिंदी भाषेत हा चरित्रपट प्रदर्शित होणार आहे. 'ढसाळ' या आगामी चरित्रपटात ललित प्रभाकर नामदेव ढसाळ यांच्या भूमिकेतून झळकणार असून, नुकत्याच प्रदर्शित झालेल्या पोस्टरमधून त्याचा चित्रपटातील प्रभावी लूकसुद्धा पाहायला मिळतोय. संजय पांडेय आणि दि बायोस्कोप फिल्म्स प्रस्तुत वरुणा मदन-लाल राणा निर्मित या चरित्रपटात दलित पँथर चळवळीचे प्रणेते, विद्रोही कवी पद्मश्री नामदेव ढसाळ यांचा संघर्षमय आणि ज्वलंत जीवनप्रवास यामधून पाहायला मिळणार आहे. वरुणा राणा यांनी या चित्रपटाच्या लेखनाची आणि दिग्दर्शनाची धुरा सांभाळली आहे. तसेच या चित्रपटाला देशातील दिग्गज संगीतकार इल्लैयाराजा यांचे संगीत लाभले आहे. हिंदी सिनेसृष्टीतील प्रसिद्ध गीतकार इर्शाद कामील, तसेच मराठीतील गुरु ठाकूर यांनी या चित्रपटाची गाणी लिहिलेली आहेत. ललितनेसुद्धा सोशल मीडियावर चित्रपटाचं पोस्टर शेअर केलं आहे. या पोस्टला त्याने सर्वसामान्य माणसाला सत्तासंपत्तिप्रतिष्ठा यांपासून वंचित ठेवणार्या शोषणव्यवस्थेला सुरुंग लावणाऱ्या तमाम छोट्या मोठ्या चळवळींना. प्रवृत्तींना अर्पण. पद्मश्री नामदेव ढसाळ अशी कॅप्शन दिली आहे. ललितच्या या पोस्टखाली मराठीतील अनेक कलाकारांनी कमेंट्स करत त्याला शुभेच्छा दिल्या आहे. अलीकडेच ललित 'सुपर डुपर' या सिनेमामधून प्रेक्षकांच्या भेटीला आला. अशातच आता येत्या काळात ललित 'ढसाळ' या बहुप्रतिक्षित चरित्रपटातून झळकणार असून यामधील त्याचं काम आणि मोठ्या पडद्यावर नामदेव ढसाळ यांचा ज्वलंत जीवनप्रवास पाहण्यासाठी अनेक जण उत्सुक आहेत.




# अंगावर काटा आणणारं 'राजा शिवाजी'चं पहिलं गाणं!

बॉलिवूड रितेश देशमुख दिग्दर्शित 'राजा शिवाजी' सिनेमाची सध्या सर्वत्र तुफान चर्चा सुरू आहे. येत्या १ मे रोजी महाराजांची शौर्यगाथा सांगणारा हा ऐतिहासिक सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. काही दिवसांपूर्वीच रितेश अन् त्याच्या टीमने 'राजा शिवाजी' सिनेमाची पहिली झलक सोशल मीडियावर शेअर केली होती. आता या चित्रपटातील 'छत्रपती' गाण्याचा BTS व्हिडीओ सर्वत्र व्हायरल होत आहे. 'छत्रपती' या टायटल गाण्यासाठी संगीतकार अजय-अतुल आणि त्यांच्या संपूर्ण टीमने किती मेहनत घेतलीये याची झलक या व्हिडीओमध्ये पाहायला मिळतेय. या गाण्याच्या दोन ओळी ऐकताच क्षणी अंगावर काटा येतो. हे गीत सुप्रसिद्ध संगीतकार जोडी अजय- अतुल यांनी संगीतबद्ध केलं असून, त्यांनीच ते आपल्या दमदार आवाजात सादर केलं आहे. या गाण्यातील प्रत्येक बीट, प्रत्येक स्वर आणि प्रत्येक दृश्यामागे बारकाईने केलेली मेहनत या BTS व्हिडीओतून जाणवतेय. आता संपूर्ण गाणं प्रेक्षकांच्या भेटीला केव्हा येणार याची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. 'राजा शिवाजी अँथम' छत्रपती हे गीत १३ एप्रिल रोजी प्रदर्शित झाले असून, या गीतातून हिंदवी स्वराज्य, महाराजांचं शौर्य आणि प्रेरणा नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अजय-अतुलसह कोरस टीमने सुद्धा या गाण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली आहे. नेटकऱ्यांनी सुद्धा या गाण्याचा BTS व्हिडीओ पाहून कौतुकाचा वर्षाव केला आहे. अजय-अतुलच्या जोडीला तोड नाही, अंगावर काटा आला भाऊ जय शिवराय, जगदंबया सिनेमाला मोठं यश मिळो, अजय अतुल सर महाराष्ट्राची शान, कमाललवकर पूर्ण व्हिडीओ प्रदर्शित करा रितेश सर अशा प्रतिक्रिया या व्हिडीओवर आल्या आहेत. रितेश देशमुखसह या चित्रपटात संजय दत्त, अभिषेक बच्चन, विद्या बालन, महेश मांजरेकर, सचिन खेडेकर, बोमन इराणी, भाग्यश्री, फरदीन खान, जितेंद्र जोशी, अमोल गुप्ते आणि जिनिलीया देशमुख यांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. १ मे २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये मराठी आणि हिंदी या दोन्ही भाषांमध्ये हा सिनेमा प्रदर्शित होणार आहे. दरम्यान, 'जिओ स्टुडिओज' प्रस्तुत आणि 'मुंबई फिल्म कंपनी' निर्मित या चित्रपटाची निर्मिती ज्योती देशपांडे आणि जिनिलीया देशमुख यांनी केली आहे.

# भूषण प्रधानची 'स्वप्नसुंदरी' लवकरच पडद्यावर!

तरुणाईचा लाडका अभिनेता भूषण प्रधान याने काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर 'सेव्ह द डेट' अशी एक खास पोस्ट शेअर करत चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण केली होती. पोस्टमधील रोमँटिक फोटो आणि एंगेजमेंट रिंगमुळे अनेकांनी तो लग्नबंधनात अडकणार का? लग्नाची तारीख जाहीर केली का? असे प्रश्न उपस्थित केले होते. त्याच्या या पोस्टची सोशल मीडियावर चांगलीच चर्चा रंगली होती. अखेर या चर्चेचा उलगडा झाला असून त्याचा नवीन चित्रपट 'स्वप्नसुंदरी' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर समोर आले असून त्यामध्ये भूषण प्रधान आणि सायली पाटील यांची सुंदर केमिस्ट्री पाहायला मिळते. निसर्गाच्या सान्निध्यात एका निवांत ठिकाणी बसलेली ही जोडी, एकमेकांच्या सहवासात हरवलेली दिसते. सायली पाटील पारंपरिक वेशात अत्यंत मोहक दिसत असून, भूषण प्रधान तिच्याकडे प्रेमाने पाहाताना दिसतो. पोस्टरमधील मांडणी एक स्वप्नवत आणि भावनांनी भरलेला अनुभव देणारी आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन अक्षय जयसिंगराव शिंदे यांनी केले आहे. चित्रपटाच्या नावावरूनच भूषण प्रधान आपल्या 'स्वप्नसुंदरी'च्या शोधात असल्याचे दिसून येते. मात्र हा शोध त्याला कुठे घेऊन जाणार, त्याच्या आयुष्यात काय बदल घडवणार आणि त्याला त्याची स्वप्नसुंदरी खरंच मिळणार का, याची उत्सुकता प्रेक्षकांमध्ये निर्माण झाली आहे. मात्र या सर्व प्रश्नांची उत्तरं येत्या २४ जुलैला प्रेक्षकांना चित्रपटगृहांमध्ये मिळणार आहेत. चित्रपटाबद्दल बोलताना दिग्दर्शक अक्षय जयसिंगराव शिंदे म्हणतात, प्रत्येकाच्या आयुष्यात काही स्वप्नं असतात, काही इच्छा असतात आणि कुणीतरी खास व्यक्ती असते ज्याचा आपण शोध घेत असतो. 'स्वप्नसुंदरी' ही त्या शोधाची, त्या भावनांची आणि त्या नात्यांच्या प्रवासाची गोष्ट आहे. प्रेक्षकांना या कथेमध्ये स्वतःच्या आयुष्यातले अनेक क्षण दिसतील. हा चित्रपट त्यांच्या मनाला स्पर्श करेल, त्यांना विचार करायला लावेल आणि त्याचवेळी त्यांना एक वेगळी अनुभूती देईल.



शूर अम्ही सरदार आम्हाला काय कुणाची भीती...' १९६४ सालच्या 'मराठा तितुका मेळवावा' चित्रपटातील वीररसातील हे गीत काशिनाथ घाणेकर यांच्यावर चित्रित आहे. भाव्या नावाच्या शूर शिलेदाराचे काल्पनिक पात्र निर्भय बेफिकीर अंदाजात रंगविले. साधी घोड्यावरील रपेट पण त्यातही अभिनयाचा अर्क भरला. 'तलवारीशी लगीन लागल जडली येडी प्रीत' शिवबाच्या मावळ्याची निर्भय वृत्ती व कुठल्याही त्यागाची तयारी चेहऱ्यावर बेमालूमपणे अभिनित केली.




१९५८ 'या डोळ्यांची दोन पाखरे फिरतील तुमच्या भवती' १९६४ सालच्या 'पाठलाग' सिनेमात पत्नीच्या विरहात तिच्या फोटोकडे पाहून समोरच्या रेकॉर्डवर लागलेल्या वरील गाण्याने बेचैन होऊन मौनातील कोंडमारा अभिनित करून रसिकांना भावविवश केले. 'दर्शन तुमचे हाच असे हो या पक्ष्यांचा चारा सहवासावीन नकोच यांना इतर कोठला वारा' गदिमांच्या भावप्रचूर शब्दांनी भेटीची किंचित चाहूल प्रतीत झाली, पण ती चाहूलही मृगजळच ठरली.

काशिनाथांचा अभिनय जणू मौनाचे भाषांतर असा होता. 'नाच लाडके नाच जगापासुनी दूर राहूया नको जनाचा जाच...' १९६५ च्या 'पडछाया'तील तरुणाईच्या भावना उचंबळून येणारा काशिनाथ व उमा यांचा अभिनय सहज आविष्कारत साकार झाला. प्रेमाचे स्वप्न रंगविताना वरील प्रणयगीतात सोज्वळपणे काव्यातील संकेत देतात. 'हे चिंचेचे झाड दिसे मज चिनार वृक्षापरी...' १९६७ सालच्या 'मधुचंद्र' चित्रपटात देखणा नायक काशिनाथ व सौंदर्यवती उमा या जोडीचा मुग्ध करिष्मा म्हणजे हे अजरामर गाणे. गदिमांचे कल्पनाचित्र असरदार ठरले. माळरानात बोरा चिंचेच्या झाडांच्या सान्निध्यात नायिका वैतागते; त्यावर नटखट खेळकर अंदाजात काशिनाथ आपला गॉगल तिच्या डोळ्यांना लावून माळरानातील दृश्यांना काश्मीरच्या परिसरात पाहायला या कल्पनारम्य गाण्यात सुचवितो. मधुचंद्राची ही लोभस रात्र काल्पनिक काश्मिरी वातावरणात व त्याच धुंदीत सादर करून मजा आणली.

'मधु इथे अन् चंद्र तिथे फिरतो अंधारात...' वरील चित्रपटात हे दोघेही रेल्वेच्या खोट्या पासवर पळून जाताना रेल्वे अधिकारी पकडतात व वेगवेगळ्या कोठडीत बंदिस्त करतात. प्रसंग बाका असूनही दिग्दर्शक राजदत्त यांनी विनोदाची फोडणी देऊन गाणे रंजक केले. मधुचंद्र चित्रपटात नैराश्येच्या गर्तेत काशिनाथ आत्महत्या करण्यास एका डोंगराच्या काठावर उभे असताना त्यांच्या खांद्यावर थाप पडते. वळून पाहताच २०-२५ समदुःखी एका लायनीत उभे असतात व पुढील जागा रिक्त होण्याची वाट पाहात असतात. ते मागे वळून निघून जातात. नश्वर जीवनाच्या विचाराने पृथक्भुत झालेले मन पालटतानाचा कारुण्याने अपयशाने व पश्चात्तापाने होरपळलेला अभिनय काशिनाथच करू शकले.

'गोमू संगतीनं माझ्या तू येशील काय?' कोळी गीताच्या स्वरूपातले हे दिलखुलास प्रणयगीत दर्यावर्दी गायक हेमंतदा व आशाताई यांनी गायले. 'तुझं टपोल डोलं जस कोल्याचं जालं...' कोळ्याच्या भाषेत लिहिलेले शब्द त्याच पद्धतीने काशिनाथ यांनी मिश्कील पण खेळकर आविर्भावात अप्रतिम अभिनित केले. एका कडव्यात नायिका 'संगतीनं तुझ्या मी येणारऽऽ' म्हणून थांबते, त्यावेळी जीव मुठीत घेऊन पुढचे शब्द ऐकण्यासाठी आतुर चेहरा जेव्हा ती 'हायऽऽऽ' म्हणते तेव्हाच आनंदाने खुलतो. 'जाता हूं मै मुझे अब ना बुलाना...' १९६६ सालच्या हिंदीतील 'दादीमां' चित्रपटातील मोहम्मद रफींच्या आवाजातील गाण्यावर अप्रतिम अदाकारी. कुटुंब कलहातील मानसिक तणावामुळे नाईलास्तव हवेली सोडून जाताना होणारी घालमेल त्यांनी चेहऱ्यावरील भाव उजागर करून मुरलेल्या हिंदी कलाकारांसारखी अभिनित केली.'उनको नही देखा हमने कभी पर उसकी जरुरत क्या होगी ऐ मां तेरी सुरतसे अलग भगवान की सुरत क्या होगी...' टांग्याच्या घोड्यांच्या टापांच्या ह्रिदमवर हे प्रसिद्ध गीत बिना रॉय, काशिनाथ व दिलीपराजवर चित्रित आहे. मातृ ह्रदय व प्रेम उजागर होणारे हे गीत मन्ना डे व महेंद्र कपूर यांनी गायले. 'ये हाथ दुवाओ वाले रहते है सदा सरपे' या अंतर्यावर काशिनाथ यांचा गदगदीत करणारा अभिनय बाजी मारून जातो.

१४ सप्टेंबर १९३२ रोजी चिपळूण येथे काशिनाथ घाणेकर यांचा जन्म झाला. शालेय शिक्षण चिपळूण येथे, कॉलेज शिक्षण पुणे व रत्नागिरीस झाले. दंतशल्य चिकित्सकसाठी बी. डी. एस. पदवी मुंबई येथे विद्यापीठातून प्रथम येऊन प्राप्त केली. एक वर्ष प्राध्यापक राहून स्वतःचा दवाखाना थाटला. दरम्यान, डॉ. इरा-वती भिडेंसोबत विवाह झाला, पण काही वर्षांनी फारकत झाली. १९८३ साली कांचन लाटकर (सुलोचना लाटकर यांची कन्या) सोबत दुसरा विवाह झाला.

काशिनाथ यांच्या निधनानंतर कांचन यांनी 'नाथ हा माझा' हे आत्मचरित्र लिहिले. आयुष्याची क्षणभंगुरता आपल्यापरीने आपल्याच नादात तुर्रेबाज अभिनयाने अर्थपूर्ण बनविली. त्यांचे अस्तित्व रंगभूमीवर असायचे, पण प्राण समोरच्या गर्दीवर असायचे. संगीत नाट्य लयाला गेल्यावर खऱ्या अर्थी गद्य नाट्य क्षेत्राला काशिनाथ यांनी नवीन दिशा दिली. मराठी रंगभूमीचे ते पहिले सुपरस्टार ठरले.

'रायगडाला जेव्हा जाग येते' नाटकातील संभाजीची भूमिका तसेच 'अश्रूंची झाली फुले'मधील लाल्या ही दोन्ही पात्रे त्यांनी अद्भुत रंगवली. ही पात्रे त्यांची ओळख बनले. त्यांनी साधारणपणे १५ नाटकात कामे केलीत. ४० हून अधिक मराठी व २ हिंदी चित्रपटात त्यांचे योगदान आहे. 'पाठलाग' व 'देवमाणूस' चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनयाचा महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार प्राप्त झाला. 'मधुचंद्र' चित्रपटातील अभिनयासाठी ते मराठीचे पहिले प्रमुख स्टार बनले. पडद्यावरील व रंगमंचावरील अभिनयासाठी अक्षरशः वेडे असलेले व मराठी चित्रपटात दोन दशके गाजविणारे प्रमुख स्टार नाटकाच्या दौऱ्यानिमित्त अमरावती येथे त्यांना ह्रदयविकाराच्या झटक्याने गाठले.२ मार्च १९८६ रोजी त्यांचे निधन झाले. २०१९ साली सुबोध भावे यांनी बायोपिक स्वरूपात त्यांच्या प्रसिद्ध 'लाल्या' या पात्राला उजाळा देऊन या महान कलाकाराच्या स्मृती जागृत केल्या होत्या. एक दर्शक म्हणून म्हणावेसे वाटते...

**'दर्शन तुमचे हाच असे हो दर्शकांचा चारा ।**
**सहवासावीन नको आम्हाला इतर कोठला वारा ।।**

**रमेश पोफळी**

# 'देऊळ बंद २'चं पहिलं पोस्टर रिलीज

'देऊळ बंद २ - आता परीक्षा देवाची' या बहुप्रतिक्षित चित्रपटाचे पहिले पोस्टर प्रदर्शित होताच प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. पहिल्या भागात स्वामींनी आलिशान चारचाकीचा प्रवास केला होता, मात्र या पोस्टरमध्ये स्वामी एका गरीब महिलेच्या दुचाकीवरून प्रवास करताना दिसत आहेत. पोस्टरमध्ये स्वामी प्रसन्न मुद्रेत आहेत, तर स्नेहल तरडेच्या चेहऱ्यावर राग आणि डोळ्यात अश्रू दिसत आहेत. प्रवीण विठ्ठल तरडे दिग्दर्शित हा चित्रपट २१ मे ला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'देऊळ बंद २' च्या रिलीजबद्दल मागील बऱ्याच दिवसांपासून प्रेक्षकांमध्ये उत्सुकता आहे. गेल्या आठवड्यात हा सिनेमा २१ मे २०२६ रोजी रिलीज होईल, असं जाहिर करण्यात आलं. याचदरम्यान आता 'देऊळ बंद २' चे पहिले पोस्टर प्रदर्शित झाले आहे. 'देऊळ बंद'मध्ये ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांनी आपल्या सशक्त अभिनयाने आणि आवाजाने स्वामी समर्थांची भूमिका पडद्यावर जिवंत केली होती. तेच सर्वांना देऊळ बंद २ मध्ये अनुभवायला मिळणार आहे, कारण या भागात सुद्धा मोहन जोशी हेच श्री स्वामी समर्थांच्या भूमिकेत पाहायला दिसणार आहेत, तर अभिनेत्री स्नेहल तरडे महत्त्वपूर्ण भूमिका साकारणार आहे. 'देऊळ बंद २ - आता परीक्षा देवाची' च्या पहिल्या पोस्टरमध्ये प्रसन्न मुद्रेने हात उंचावत स्वामी दुचाकीवर मागे बसले असून अभिनेत्री स्नेहल तरडे ती दुचाकी चालवत आहेत. स्वामी जरी प्रसन्न मुद्रेत असले तरी स्नेहल यांच्या चेहऱ्यावर राग आहे आणि डोळ्यातून अश्रू ओघळत आहेत, आता हा राग कशासाठी आणि दुःख कशाचे? यासाठी प्रेक्षकांना चित्रपटाची वाट पाहायला लागणार आहे. 'भक्त कितीही संकटात असला तरी स्वामी त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे असतात', हाच संदेश या पोस्टरमधून अधोरेखित होत आहे. पहिल्या भागात स्वामींनी परदेशातून आलेल्या शास्त्रज्ञाच्या आलिशान चारचाकीतून प्रवास केला होता तर 'देऊळ बंद २' मध्ये स्वामी एका गरीब महिलेच्या सामान्य दुचाकीवरून प्रवास करताना दिसत आहेत. त्यामुळे प्रेक्षकांना या चित्रपटात एका सामान्य कुटुंबाची असामान्य गोष्ट पाहायला मिळणार असे दिसत आहे. वटवृक्ष एंटरटेनमेंट निर्मित 'देऊळ बंद २' ची कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन अष्टपैलू कलाकार प्रविण विठ्ठल तरडे यांचे असून निर्मिती कैलाश वाणी, जयश्री कैलाश वाणी, कैवल्य वाणी आणि जुईली वाणी- सूर्यवंशी यांनी केली आहे. हा चित्रपट २१ मे २०२६ रोजी प्रदर्शित होईल.



# 'या' चित्रपटातून झळकणार रणवीर सिंह?



बॉलिवूडमधील बॉलीवूड दिग्दर्शक आदित्य धर सध्या त्याच्या 'धुरंधर २' चित्रपटाला मिळत असलेल्या प्रतिसादामुळे चर्चेत आहे. १९ मार्चला रिलीज झालेला हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर तुफान कमाई करत आहे. 'धुरंधर २'ने अनेक सुपरहिट चित्रपटांचे रेकॉर्ड मोडले. अशातच आता येत्या काळातसुद्धा आदित्य धर काही बिग बजेट चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येणार आहे. आदित्य धर गेल्या काही म हिन्यांपासून त्याच्या चित्रपटांमुळे प्रचंड चर्चेत आहे. २०२५ च्या शेवटी डिसेंबरम ध्ये 'धुरंधर' प्रदर्शित झाला. त्यातील पात्र, गाणी, संवाद सगळं सोशल मीडियावर अक्षरशः व्हायरल झालं आणि बॉक्स ऑफिसवरही या चित्रपटाने रेकॉर्ड ब्रेकिंग कमाई केली. त्यानंतर लगेचच काही दिवसांच्या विश्रांतीनंतर चित्रपटाचा सीक्वल 'धुरंधर २' रिलीज झाला. आदित्य धर सध्या तीन बिग बजेट चित्रपटांवर काम करत आहे. यामध्ये 'द इमोर्टल अश्वत्थामा', एक ऐतिहासिक आणि एक स्पोर्ट्स ड्रामा यांचा समावेश आहे. आदित्य त्याचं ड्रीम प्रोजेक्ट 'द इमोर्टल अश्वत्थामा' ज्याचं काम बजेटच्या अडचणींमुळे थांबलं होतं त्यावर पुन्हा काम करायला सुरुवात करणार आहे. या चित्रपटात आधी बॉलीवूड अभिनेता विकी कौशल झळकणार होता. पण, आता आदित्यला मोठ्या स्केलवर हा चित्रपट बनवायचं असल्याचं म्हटलं जात आहे. आदित्य धर चंद्रगुप्त मोर्य यांच्या शासनकाळावर आधारित एक ऐतिहासिक महाकाव्य बनवणार आहे. ज्यासाठी तो खूप उत्सुकआहे. तर या चित्रपटात रणवीर सिंह झळकणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे.



# अभिषेकचे मराठी चित्रपटात पदार्पण

'राजा शिवाजी' हा चित्रपट १ मे २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये मराठी, हिंदी आणि तेलुगू भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात अभिषेक बच्चन हे छत्रपती शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ बंधू संभाजी शहाजी राजे भोसले यांची भूमिका साकारत आहेत. त्याच्या या भूमिकेमुळे इतिहासातील एक महत्वाचा अध्याय नव्या पिढीसमोर भव्य स्वरूपात साकारला जाणार आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'राजा शिवाजी' या सिनेमाच्या दमदार 'फर्स्ट लूक टीझर'मध्ये अभिषेक बच्चन एका पूर्णपणे वेगळ्या आणि प्रभावी लूकमध्ये दिसून आला. योद्ध्याचा साज चढवलेला पेहराव, रणांगणावरची त्यांची दमदार उपस्थिती आणि बंधुप्रेमाची झलक दाखवणारा भावनिक आविष्कार यामुळे हा टीझर प्रेक्षकांना भारावून गेला. या चित्रपटात अभिषेक बच्चनसह संजय दत्त, विद्या बालन, महेश मांजरेकर, सचिन खेडेकर, बोमन इराणी, भाग्यश्री, फरदीन खान, जितेंद्र जोशी, अमोल गुप्ते, जिनिलिया देशमुख आणि स्वतः रितेश विलासराव देशमुख यांसारख्या दिग्गज कलाकारांचा समावेश आहे. 'जिओ स्टुडिओज'द्वारे सादर करण्यात आलेला आणि 'मुंबई फिल्म कंपनी'च्या बॅनरखाली ज्योती देशपांडे व जिनिलिया देशमुख यांनी निर्मित केलेला 'राजा शिवाजी' हा चित्रपट १ मे २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये मराठी, हिंदी आणि तेलुगू भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे.



# रश्मिकाचा 'मैसा'मधील खतरनाक लूक रिव्हील

साऊथ आणि बॉलिवूडमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण करणारी अभिनेत्री रश्मिका मंदानाने चाहत्यांसाठी निर्मात्यांनी एक खास सरप्राईज देत तिच्या आगामी 'मैसा' सिनेमातील नवा लूक रिलीज केला आहे. या नव्या पोस्टरमध्ये रश्मिका पूर्णपणे वेगळ्या आणि दमदार अवतारात दिसत आहे. तिच्या चेहर्‍यावर जखमा, धूळ आणि रक्ताचे डाग दिसत असून डोळ्यांत अंगार झळकत आहे. आतापर्यंतच्या तिच्या गोड आणि आकर्षक भूमिकांपेक्षा हा लूक पूर्णपणे वेगळा असून, या सिनेमातील तिची पडद्यावरील प्रतिमा बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. निर्मात्यांनी पोस्टर शेअर करताना खास कॅप्शनही दिले आहे. तिने तिच्या तेजाने राज्य केले, मोहकतेने मने जिंकली आता ती तिच्या आवेशाने सर्वांना थक्क करायला येत आहे. तिच्या आतापर्यंतच्या सर्वात दमदार अभिनयासाठी तयार व्हा असे लिहिण्यात आले आहे. हा सिनेमा २४ डिसेंबर २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. दरम्यान, रश्मिका तिचा पती विजय देवरकोंडा याच्यासोबत 'राणाबली' या सिनेमातही दिसणार आहे. ११ सप्टेंबर २०२६ रोजी प्रदर्शित होणारा हा सिनेमा दोघांच्या लग्नानंतरचा पहिला एकत्रित प्रोजेक्ट असणार आहे. या सिनेमात रश्मिका 'जयम्मा'च्या भूमिकेत झळकणार असून, दोघांनाही एकत्र पाहण्यासाठी चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. रश्मिका मंदाना ही एक लोकप्रिय भारतीय अभिनेत्री आहे. जी प्रामुख्याने तेलुगू, कन्नड आणि हिंदी सिनेमांत काम करते. तिच्या क्यूट एक्सप्रेशन्स, स्क्रीन प्रेझेन्स आणि अभिनयामुळे ती दक्षिण भारताबरोबरच बॉलिवूडमध्येही प्रचंड लोकप्रिय झाली आहे. त्यामळेच तर तिला नॅशनल क्रश म्हटले जाते.



# 'रागिनी ३'मध्ये तमन्ना भाटिया



'रागिनी ३' चित्रपटाचे दिग्दर्शन शशांक घोष करणार आहे. या चित्रपटात तमन्ना भाटिया ही अभिनेत्री दिसून येणार असून तिची जोडी आमिर खानचा पुत्र जुनैदसोबत जमणार आहे. आमिरचा पुत्र जुनैदने यापूर्वी काही चित्रपटांमध्ये काम केले असले तरीही याला यश मिळालेले नाही. यामुळे तो आता हॉररपटात काम करणार आहे. रागिनी एमएमएस सीरिजच्या चित्रपटांमध्ये रोमान्स, विश्वासघात आणि हॉररचा डोस प्रेक्षकांना दिला जातो, असाच प्रकार तिसऱ्या भागातील चित्रपटात पहायला मिळणार आहे. साहिर रजा या चित्रपटाची निर्मिती करणार आहेत. रागिनी एमएमएस ३ चित्रपटात आणखी काही दिग्गज कलाकारांची वर्णी लागणार असून याचे चित्रिकरण लवकरच सुरू केले जाणार आहे. रागिनी ३ चित्रपटासोबत तमन्ना भाटिया ही 'व्ही. शांताराम' यांच्या बायोपिकमध्ये महत्वाची भूमिका साकारत आहे. तसेच ती 'वन' हा भयपट देखील करत आहे. याचबरोबर 'रेंजर' नावाचा चित्रपट तिच्याकडे आहे. तमन्नासाठी चालू वर्षे अत्यंत महत्वाचे ठरणार असून तिचे अनेक चित्रपट यंदा प्रदर्शित होणार आहेत.

# रायमा सेनचे कमबॅक!

साऊथसह चित्रपटसृष्टीत अनेक कलाकार सातत्याने काम करत असले तरी काहीजण विश्रांती घेत पुन्हा नव्या जोमाने परत येतात. अशाच अभिनेत्रींपैकी एक म्हणजे रायमा सेन. दोन वर्षांच्या विश्रांतीनंतर ही प्रसिद्ध अभिनेत्री पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज झाली आहे. ती बऱ्याच काळापासून चित्रपटसृष्टीत कार्यरत आहे आणि तिच्या कुटुंबातील चित्रपटांमध्ये काम करणारी ती तिसऱ्या पिढीतील आहेत. आजी, सुचित्रा सेन, बंगाली चित्रपटसृष्टीतील एक आघाडीच्या आणि अत्यंत प्रतिष्ठित अभिनेत्री होत्या. देशातील पहिल्या आंतरराष्ट्रीय पुरस्कार विजेत्या अभिनेत्रीचा मान त्यांना मिळाला आहे.

रायमा सेनची आई मून मून सेन यादेखील एक प्रसिद्ध अभिनेत्री होत्या आणि त्यांनी अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. तिची धाकटी बहीण रिया सेन हिनेही विविध भाषांतील चित्रपटांमध्ये काम केले आहे. रायमा सेनने 'गॉडमदर' या चित्रपटातून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली आणि आता तिने चित्रपटसृष्टीत २६ वर्षे पूर्ण केले आहेत. ही अभिनेत्री दमन, चोखेर बाली, शक्ती, परिणीता, दस, एकलव्य, मनोरमा सिक्स फीट अंडर, सी कंपनी, मुखबीर, मुंबई कटिंग, तीन पट्टी, आय मी और में, ३ बॅचलर, कागज के फूल, आणि द वॅक्सीन वॉर यांसारख्या चित्रपटांमध्ये दिसली आहे. हिंदी व्यतिरिक्त ती बंगाली, मराठी, तेलुगू आणि मल्याळम चित्रपटांमध्ये देखील दिसली आहे. पण अभिनेत्री काही काळापासून चित्रपटसृष्टीत दिसलेली नाही. तिचा शेवटचा चित्रपट 'चलचित्रो द फेम फेटल', २०२४ मध्ये प्रदर्शित झाला होता.

आता दोन वर्षांच्या विश्रांतीनंतर अभिनेत्री पुनरागमन करण्यास सज्ज झाली आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत याबद्दल बोलताना ती म्हणाली, हिंदी चित्रपटसृष्टीत परत येणे नेहमीच आनंददायी असते. मला हे कबूल करायलाच हवे की, यावेळी थोडा जास्त वेळ लागला. रायमा सेनबद्दल बोलायचे झाल्यास ती हंसल मेहता दिग्दर्शित 'फॅमिली बिझनेस' या नेटफ्लिक्स ओरिजिनल सीरिजमध्ये दिसणार आहे. यामध्ये अनिल कपूर आणि विजय वर्मा यांसारख्या दिग्गज कलाकारांसोबत रिया चक्रवर्ती, नेहा धुपिया आणि आकाश खुराना या कलाकारांचाही समावेश आहे. या सीरिजची घोषणा फेब्रुवारी २०२६ मध्ये करण्यात आली होती. परंतु प्रदर्शनाची निश्चित तारीख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.

# मी स्टेडियममध्ये बसून मिरवणारा नाही!



आयपीएलमध्ये शाहरुख खान, प्रीती झिंटा यांसारख्या अनेक बॉलीवूड स्टार्सची गुंतवणूक असताना अभिषेक बच्चन मात्र या स्पर्धेपासून दूर राहिला. याचे नेमके कारण स्वतः अभिषेकने एका मुलाखतीत स्पष्ट केले असून, केवळ आर्थिक बाबीच नव्हे तर 'योगदान' देण्याची इच्छा हे देखील एक मोठे कारण असल्याचे त्याने सांगितले. अभिनेता अभिषेक बच्चन प्रो कबड्डी आणि फुटबॉलमधील संघांचा मालक आहे. मात्र, तो क्रिकेट स्पर्धा इंडियन प्रीमियर लीगपासून दूर राहिला. प्रीती झिंटा, शाहरुख खान, जुही चावला आणि शिल्पा शेट्टी सारख्या अनेक बॉलीवूड कलाकारांनी आयपीएलमध्ये गुंतवणूक केली आहे. अभिषेकने आयपीएलची टीम विकत न घेण्याचं कारण सांगितलंय. अभिषेकने आयपीएल संघ न खरेदी करण्यामागचं कारण स्पष्ट करताना तो म्हणाला, खरं तर आयपीएल खूप मनोरंजक आहे. मला वाटतं की स्पोर्ट्स एंटरटेनमेंटच्या बाबतीत आयपीएल सर्वोत्तम आहे. मला त्याचा भाग व्हायला नक्कीच आवडेल, पण खरं सांगायचं तर, जेव्हा आयपीएल सुरू झालं तेव्हा ते खूप महाग होतं. त्यावेळी मी एक नवोदित अभिनेता होतो आणि मी थोडे चांगले पैसे कमावू लागलो होतो, पण तरीही ते माझ्या बजेटच्या बाहेर होते. आर्थिक कारणांशिवाय, आपण या खेळाला काय योगदान देऊ शकतो, असा प्रश्नही त्याला पडला. तो पुढे म्हणाला, महत्त्वाचं म्हणजे, मी तिथे काय योगदान देऊ शकेन हे मला माहित नव्हतं. इन्फ्रास्ट्रक्चरच्या बाबतीत बीसीसीआय उत्तम काम करत आहे, मग मी नवीन काय करू शकलो असतो? फक्त स्टँडमध्ये बसून हात हलवत 'बघा, एक स्टार आलाय' असं मिरवणारा मी नाही. संघाचा मालक म्हणून आपल्या कामाच्या पद्धतीबद्दल अभिषेक बच्चनने सांगितलं. जर तुम्ही मला माझ्या सामन्यांच्या वेळी पाहिलं असेल, तर मी त्यात पूर्णपणे गुंतलेला असतो. मी खेळाडूंबरोबर बसतो, त्यांच्याबरोबर राहतो आणि शक्य असल्यास त्यांना प्रशिक्षणही देतो. अगदी ते रोज काय खातात, हे देखील मीच ठरवतो. मी प्रत्येक लहान-मोठ्या गोष्टीवर स्वतः लक्ष ठेवतो, मला असंच काम करायला आवडतं, असं अभिषेक बच्चनने सांगितलं. क्रिकेटबद्दल बोलताना त्याने कबूल केलं की, मी त्यात काय योगदान देऊ शकेन हे मला माहित नव्हते, कारण तेव्हा मला या खेळाबद्दल आता माहित आहे, तेवढं त्यावेळी माहित नव्हतं. मला इतर खेळांची जास्त माहिती होती. त्यामुळे मी क्रिकेटमध्ये काय मदत करू शकेन, हे मला कळत नव्हतं. पण भविष्यात काहीही होऊ शकतं, कदाचित पुढे मी या स्पर्धेचा भाग होईन, असं अभिषेक बच्चनने नमूद केलं.